पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - २०९ दिनांक - २८/०३/२०२५**

हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर

## २४ लाखांची ऑनलाईन ट्रांजेक्शन करून फसवणूक करणा-या दोघांना हडपसर पोलीसांकडून अटक

यातील फिर्यादी यांचे वडील वय ६४ वर्ष यांचे अकाऊंन्ट चा ऑनलाईन ॲक्सेस घेवून वेगवेगळया अनोळखी व्यक्तींच्या खात्यावर पैसे ट्रान्सफर करुन एकुण रक्कम रुपये २४,४८,०००/- रुपयांची फसवणुक केल्याने हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं १९२९/२०२४ भा.न्या.सं.कलम ३१८(४),३(५), आयटी ॲक्ट ६६(ड) गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय मोगले,याचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक,गुन्हे श्री.निलेश जगदाळे, आणि पो.अंमलदार संदीप राठोड,सचिन गोरखे,गायत्री पवार,तेजस पांडे असे करीत असताना,फिर्यादी यांचेकडून माहीती घेतली असता,फिर्यादी यांचे वडिल हे कुटूंबापासून वेगळे एकटेच राहत होते.त्यांना दैनंदिन गरजेच्या कामामध्ये ते राहत असलेल्या ठिकाणी वॉचमन म्हणून काम करणारा हनीफ नावाचा इसम मदत करीत असलेबाबत माहीती प्राप्त झाली.फिर्यादी यांचे वडिलांचे अकाऊंन्टवरून ट्रांजेक्शन झालेले रक्कमे बाबत बँककडून माहीती प्राप्त करून त्याची पडताळणी केली असता,ती रक्कम इफ्तीकार खान आणि नुर जहॉं यांचे बँक अकाऊंन्टवर ट्रांन्सफर झाल्याबाबत दिसून आले.तसेच वॉचमन म्हणून काम पाहणारा इसम हनीफ हा घटनेनंतर काम सोडून फरार झाला होता.

संशयीत इसमांचे मोबाईल नंबर हे बंद झाल्याचे दिसून आले.गुन्ह्याचे केले तांत्रिक तपासामध्ये हनीफ आणि इफ्तीकार खान हे एकमेकांच्या संपर्कात असलेबाबत दिसून आले.संशयीत इसमाबाबत उपयुक्त माहीती गोळा करून पोलीस उप निरीक्षक हसन मुलाणी, चंद्रकांत रेजितवाड,अमोल दणके, गायत्री पवार यांचे पथक गोवंडी,मुंबई येथे जावून त्यांनी केले तपासामध्ये आरोपी **इफतीकार रहिमखान पठाण वय ३१ वर्षे,रा.फ्लॅट नंबर-७०७,७ वा मजला,रेहान पार्क,गौतम नगर,गोवंडी मुंबई** यास ताब्यात घेतले. आरोपीस ताब्यात घेतल्यानंतर त्याचेकडू हनीफ बाबत माहीती घेतली असता तो सध्या हांडेवाडी पुणे शहरात कोठेतरी राहत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली त्यावरून पोलीस अंमलदार अविनाश गोसावी,कुंडलीक केसकर यांनी आरोपी **२) मोहम्मद हनीफ मोहम्मद अफसर वय ५२ वर्षे,सध्या रा.म्हसोबा मंदिराचे पाठीमागे,काळेपडळ,हडपसर पुणे मुळ रा.पातूर,जि.अकोला** यास ताब्यात घेतले. आरोपींकडे केले कौशल्यपुर्ण तपासात त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.तसेच सांगीतले की, मोहम्मद हनीफ मोहम्मद अफसर आणि इफतीकार रहिमखान पठाण हे नात्याने एकमेकांचे मेव्हणे असल्याचे

सांगीतले. तसेच मोहम्मद हनीफ मोहम्मद अफसर हा सिक्युरीटी म्हणून काम करीत असताना,त्यास फिर्यादी यांचे वडील हे वेगवेगळी कामे सांगत होते त्यामुळे ते एकटे राहत असल्याबाबत इफतीकार पठाण यास हनीफ मार्फत समजले होते त्यामुळे आरोपी यांनी आपसात संगनमत करून ओळख वाढवून,त्यांना व्यसनाचे आहारी नेवून,वेळोवेळी एकत्र बसून,त्यांचे मोबाईलचा व बँकींग ॲक्सेस घेवून, त्यांचे बँक खात्यावरील रक्कम आरोपींनी स्वतःचे व आपले नातेवाईकांचे बँक खात्यांवर परस्पर वळवून, रक्कम रुपये २४,४८,०००/- रुपयांची फसवणुक केल्याचे सांगीतले.आरोपी यांची दिनांक ३१/०३/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, गुन्हे श्री.निलेश जगदाळे,हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त ,परिमंडळ ५ श्री.डॉ. राजकुमार शिंदे, यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर,श्री.संजय मोगले, पोनि.(गुन्हे),श्री.निलेश जगदाळे,यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक हसन मुलाणी,अविनाश गोसावी,संदीप राठोड,तेजस पांडे,गायत्री पवार, चंद्रकांत रेजितवाड,अमोल दणके,कुंडलीक केसकर यांचे पथकाने केली आहे.

